**उपवनसंरक्षक नांदेड वनविभाग नांदेड यांचे कार्यालय.**

आदेश.

विषय :-वनरक्षक पदावरुन वनपाल पदी पदोन्नती देणे बाबत..

जा.क्र.ब./१२/आस्था/ 1926 सन,२००८-०९.
नांदेड, दिनांक 30 /६/२००८.

संदर्भ :-मुख्य वनसंरक्षक प्रादेशिक औरंगाबाद यांचे आदेश क्रमांक कक्ष-२/१२/आस्था/प्रक्र-/०७-०८/१६५५/ दिनांक २६ जुन २००८.

उपरोक्त विषयांच्या संदर्भान्वये विभागीय निवड समितीने पात्र ठरविण्यांत आलेल्या वनरक्षकांना शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, एसआरव्ही-१०९५/प्रक्र१/९५/१२ दिनांक ८/६/१९९५ तसेच शासन निर्णय क्रमांक एसआरव्ही/१०९५/प्रक्र.१३/९५/१२ दिनांक १/१२/१९९५ मधील तरतुदी प्रमाणे औरंगाबाद वनवृत्तातील खालील वनरक्षकांना वनरक्षक पदावरुन वनपाल पदावर पदोन्नत होणा-यांना कर्मचा-यांना कर्मचा-यांना कालबध्द पदोन्नतीचा फायदा मजुर करण्यांत आलेला असुन **वनपाल संवर्गाची वेतनश्रेणी रुपये ४०००-१००-६००० त्यांना यापुर्वी देण्यांत आलेली आहे.**

२. सदर आदेशानुसार आता त्यांना मा.उच्च न्यायालय, मुळ शाखा मुंबई येथे सुरु अससलेल्या मुळ याचिका क्रमांक ८४५२/२००४ च्या अंतिम निर्णयाच्या अधीन राहुन औरंगाबाद वृत्तामध्ये वनपालाचे रिक्त असलेल्या जागेनुसार **वनपाल पदाचा दर्जा/ पदोन्नती याद्वारे देण्यांत येत असुन त्यांचे सविस्तर पदस्थानेचे आदेश प्रशासकिय तत्वावर खालील प्रमाणे निर्गमित करण्यांत येत आहे.**

३. **जे वनरक्षक पदोन्नती नाकारतील त्यांचे बाबतीत महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक वेतन-२०००/प्रक्र.१०/सेवा-३,दिनांक ३ ऑगस्ट २००१ मधील तरतुदीनुसार त्यांना देण्यांत आलेला आश्वासित प्रगती योजनेचा लाभ काढुन घेण्यांत येईल याची त्यांनी नोंद घ्यावी.**

| अ.क्र. | नांव सर्वश्री. | कार्यरत ठिकाण | पदस्थापनेचे ठिकाण. | पदस्थापने नंतरचा विभाग. |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | ए.एस.क्यादरवाड, वनरक्षक | वनपरिक्षेत्र नांदेड. | सहाय्यक लागवड अधिकारी, पदावर | सामाजिक वनीकरण विभाग, लातुर (रिक्त पदी.) |
| २. | एस.एम.कोम्पलवार, वनरक्षक | वनपरिक्षेत्र हदगांव | सहाय्यक लागवड अधिकारी, पदावर | सामाजिक वनीकरण विभाग, लातुर (रिक्त पदी.) |
| ३. | एस.बी.सलमेटी, वनरक्षक | वनपरिक्षेत्र इस्लापुर | सहाय्यक लागवड अधिकारी, पदावर | सामाजिक वनीकरण विभाग, लातुर (रिक्त पदी.) |

४. सदरचे आदेश तात्काळ अमलांत येतील. तेव्हा वनक्षेत्रपाल नांदेड, हदगांव ,इस्लापुर यांना देवुन कळविण्यांत येते की, संबधित वनरक्षकांस स्थानीक व्यवस्था करुन तात्काळ कार्यमुक्त करण्यांत यावे आणि अनुपालन अहवाल या कार्यालयास सादर करावा.

उप वनसंरक्षक,
नांदेड.

प्रति,

सर्व संबधीत कर्मचारी मार्फत :- वनक्षेत्रपाल नांदेड, हदगांव, इस्लापुर.

प्रतिलिपी :- वनक्षेत्रपाल नांदेड, हदगांव, इस्लापुर.

प्रतिलिपी :- उप संचालक , सामाजिक वनीकरण विभाग लातुर यांना योग्य त्या कार्यवाहीस्तव अग्रेषित.

प्रतिलिपी :- मुख्य वनसंरक्षक प्रादेशिक औरंगाबाद यांना माहितीस्तव सविनय सादर.

प्रतिलिपी :- सहा. वनसंरक्षक तेंदुपाने नांदेड , रोहयो नांदेड यांना माहितीस्तव रवाना.